Espalier इस्पॅलियर
The Experimental school

# WOMEN'S EQUALITY DAY
CHAMPAIGN
माँ तुझे सलाम

superhits RED FM 93.5 Bajaate Raho!

NAME — MOTHER NAME — FATHER'S NAME — SURNAME
(MOTHER NAME + FATHER'S NAME = MIDDLE NAME)

इस्पॅलियर ही प्रयोगशील शाळा असून दरवर्षी एक तरी सामाजिक, शैक्षणिक बदल इथले विद्यार्थी करत असतात. मागील वर्षी आमच्या विद्यार्थ्यांनी सर्वानुमते ठरविले की, आपण आपले पूर्ण नाव दुसऱ्यांना सांगतांना आणि लिहितांना आपल्या **''आईचे नाव''** वडीलांच्या नावाआधी लिहावे व सांगावे. ह्यामागे भावना अशी होती की, मुलांना वाढवितांना आईचे योगदान सर्वात जास्त असते. पण तिचा साधा उल्लेख कुठेही होत नाही. लाईट बिलापासून ते शाळेच्या दाखल्यापर्यंत, सरकारी कागदपत्रापासून ते शाळेच्या ओळखपत्रापर्यंत कुठेही तिचे नाव नाही. सगळीकडे फक्त वडीलांचे नाव आहे. हे पुरुष प्रधान संस्कृतीचे लक्षण नाही का? का नाही आपण आपल्या नंतर आईचे नाव लावू शकत? इस्पॅलियरने बदल घडवायला सुरुवात केली. आमचे ८०० विद्यार्थी त्यांच्या नावासोबत आईचे नाव लावतात. शाळा या मुलांच्या निर्णयाला Support करते, म्हणून शाळेने Enquiry Form, Admission Form पासून ते विद्यार्थ्यांचे I-Card, Government Form, G.R., Progress Card सर्व ठिकाणी आईचे नाव लिहीण्याची सोय करुन दिली. एवढेच नाही तर विद्यार्थ्यांना कोणी विचारले तर तो/ती त्यांच नाव सांगतांना आईचे नाव सामिल करुन सांगतात.

आता हा बदल शाळेबाहेर सुध्दा करतो आहे. आमचे प्रायमरीचे ५०० विद्यार्थी त्यांच्या घराजवळील परिसरातील २ मित्र-मैत्रिणीनां आईचे नाव लावण्याचे महत्त्व पटवून देणार आहेत. आमचे २० विद्यार्थी विविध शाळेत जाऊन तेथील मुख्याध्यापक आणि विद्याार्थ्यांना या विषयाबद्दल जनजागृत करणार आहेत.

२६ ऑगस्ट हा 'World Women's Equality Day' म्हणून जगात साजरा होतो. २६ ऑगस्ट पर्यंत आमचे विद्यार्थी किमान १०,००० विद्यार्थ्यांना पटवून देणार आहेत की, स्त्रीला सन्मान द्यावयाचा असेल तर आपल्या पूर्ण नावात आईचे नाव लावायला सुरुवात करा.

आम्ही मानतो की, विद्यार्थीच हा बदल घडवून आणू शकतो, तर चला मग बदल घडवू या!

**नाव लावू आईचेही, गाऊ तिचे गुणगाण.**
**प्रत्येक स्त्री घरातील, या देशाची शान.**

आपल्याला ही वाटते की, आपणसुध्दा आपल्या नावात आईचे नाव सामिल करु इच्छिता तर Campaign मध्ये सामिल व्हा आणि खालील सम्मती पत्र भरुन आमच्या कडे जमा करा.

**जन्म दिला, जीव लावला, आदर तिचा ठेवु,**
**जाऊ जिथे, बोलु तिथे, नाव आईचे घेवु**

**सचिन उषा विलास जोशी**
शिक्षण अभ्यासक

---

## प्रतिज्ञा पत्र

आज इस्पॅलियर स्कूलच्या विद्यार्थ्यांनी मला समजवून, पटवून दिले आहे की, आपल्या नावांसोबत आईचे नाव प्रथम मग बाबांचे नाव आणि शेवटी आडनाव लावावे त्यामुळे आजपासून मी माझे नाव

नांव : ........................ ........................ ........................ ........................
प्रथम नाव — आईचे नाव — वडीलांचे नाव — आडनाव

शाळेचे नांव / ऑफिसचे नांव : ..........................................................................
.......................................................................... मोबा. नं. : ☐☐☐☐☐☐☐☐☐☐

घरचा पत्ता : ..........................................................................
..........................................................................

सही